# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, मुंबई -४०० ०१३.
दूरध्वनी क्र. ०२२-४३२२६८२५/२६, ई-मेल - mlwbpro53@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मका/बांधकाम/२०२२/२८८ दिनांक : ०८/१२/२०२२

## जाहीर प्रकटन

विषय – महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळघरात व आवारात असलेले लोखंडी पत्रे, लोखंडी गेट व इतर पडीक भंगार विक्री करीता दर मागविणेबाबत.

संदर्भ – मा.कल्याण आयुक्तांनी मान्य केलेली दि.०८/१२/२०२२ रोजीची टिप्पणी.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळघरात व आवारात लोखंडी पत्रे, लोखंडी गेट व आदी निरुपयोगी भंगार साहित्याची विक्री करणेस्तव मुल्यांकन करावयाचे आहे. यासाठी इच्छुक दुकानदार / व्यावसायिक / पुरवठादार यांचेकडून सीलबंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती -

१) सदर पत्रकासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

२) दरपत्रकामध्ये अक्षरी व आकड्यात दर नमूद करावेत. अक्षरी व आकड्यात फरक असल्यास सर्वांत जास्त दर ग्राह्य धरण्यात येतील.

३) नमूद केलेले दर सर्व करासहित व इतर खर्च मिळून असावेत. वाहतूक, मजुरी इत्यादी सर्व खर्चांचा विचार करुन दर नमूद करावेत. या कार्यालयाकडून कोणताही खर्च / आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही.

४) पुरवठादाराची दरपत्रकामध्ये असलेली कोणतीही अट व शर्त मान्य केली जाणार नाही.

५) साहित्याचे दरपत्रक सादर करण्यापुर्वी साहित्याची पाहणी करुन नंतरच दरपत्रक सादर करावे. साहित्य पाहणीकरीता संबंधित कार्यालयाच्या तळघरात / आवारात उपलब्ध आहे. दर मंजुरीनंतर विक्री आदेशानुसार निश्चित होणाऱ्या रकमेवर नियमानुसार कर आकारण्यात येईल.

६) विक्री केलेल्या साहित्याची उचल आदेश निर्गमित झाल्यापासून ५ दिवसांचे आत स्वखर्चाने करावी लागेल. उचल करण्यास विलंब झाल्यास विक्री किमतीवर प्रती दिवशी २ टक्के भुभाडे आकारण्यात येईल.

७) कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम रु.५० हजार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ / Maharashtra Labour welfare Board या नावे डी.डी.द्वारा जमा करावी लागेल. सदर रक्कम बिलाच्या रकमेत समायोजित केली जाईल.

८) दि.१४/१२/२०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करावे. दुपारी ३ वाजेनंतर दरपत्रकांचा स्विकार केला जाणार नाही, शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी ४ वाजता दरपत्रके उघडण्यात येतील.

९) एक किंवा सर्वच दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार या कार्यालयाला राहील.

**दरपत्रकाचा नमुना**

| अ.क्र. | साहित्याचा / कामाचा तपशिल | दर (रुपये) प्रती किलो रक्कम (रु.) |
|---|---|---|
| | लोखंडी गेट, आय बीम, चौरस पाईप, पत्रे, इत्यादी पडीक भंगार / साहित्य | |
| | अधिक जीएसटी १८ टक्के | |
| | एकूण दर | |

(मनोज बागले)
प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी
अति.कार्यभार (बांधकाम शाखा)